# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ४११००७
## Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email: pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## सुधारित परिपत्रक

**विषय:–** **शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवीदिल्ली बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाचे शुल्काबाबत...**

**संदर्भ :–** **१) मा. प्र. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे परिपत्रक क्र.तंशिविकापू /विवि/बीबीए–बीसीए शुल्क २०२४–२५/८४१, दि. ११/०३/२०२५.**
**२) विद्यापीठ परिपत्रक क्र. PGS/3737, Date. 23/11/2024.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. प्र. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे वरील संदर्भीय परिपत्रकान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवीदिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना आहे त्या स्थितीत (As and where) परिषदेच्या अधिपत्याखाली अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये तसेच तदनंतरही बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना मान्यता प्रदान केली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पाडलेली आहे.

वरील अभ्यासक्रम हे प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून ते प्रशासकीय कारणास्तव व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून विलंबाने घोषित झाले आहेत. तरी वरील संदर्भीय परिपत्रक क्र. १ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व त्याअनुषंगाने डीबीटी पोर्टलवर करावयाच्या कार्यवाहीबद्दल निर्देश देण्यात आलेले आहेत. (सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.) तरी वरिल संदर्भीय परिपत्रक क्र. २ मध्ये नमूद बी.बी.ए. (नाशिक उपपरिसर) अभ्यासक्रमाचे शुल्क बी.बी.ए., बी.सी.ए., एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता संबंधित संस्थांनी आकारावे.

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी वरील संदर्भीय परिपत्रकानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

या विभागाचे दि. २५/०३/२०२५ रोजीचे संदर्भ परिपत्रक क्र. शै. प्रवेश/७६२ रद्द समजण्यात यावे.

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/ ८३८ }
दिनांक : २८/०३/२०२५ }

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx